# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


**उपसंचालक, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण-नि-उपशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (तांत्रिक).**

**धारिका क्रमांक : १५(१)(६०)/१७२६/सात जाहिरात क्रमांक : १८ / २०१०**

आयोगामार्फत उपसंचालक, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण-नि-उपशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (तांत्रिक). या पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| पदाचे नाव | एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उपसंचालक, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण-नि-उपशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ), गट-अ (तांत्रिक). | ३ | २ | - | १ | - | - | - | - | - | - |

**(१)** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. **(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. अपंग-२००९/(७६/०९)/आस्था-२ दिनांक २७ एप्रिल, २००९ नुसार अंध/अल्पदृष्टी मधील फक्त अल्पदृष्टी (LV), कर्णबधीर मधील फक्त अंशतः कर्णबधीर (PD), अस्थिव्यंग मधील एका पायाने अधू/एका हाताने अधू (OL/OA) प्रवर्गाचे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. तथापि, अपंग प्रवर्गासाठी पद उपलब्ध नाही.

**३. वेतनश्रेणी-** ₹ १५,६०० - ३९,१०० + ग्रेड पे ₹ ६९००/- , एकूण वित्तलब्धी अंदाजित ₹ ३५,०००/-

**४. पात्रता:- ४.१** भारतीय नागरिक. **४.२ वय:-** (१) **दिनांक ०१ मार्च, २०११** रोजी ४० वर्षे , मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम.(२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. (३) शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादींसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. **परंतुक-** (४) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत जर आयोगाने शिफारस केली तर शासनाकडून उच्च वयोमर्यादा शिथिल होऊ शकेल. **४.३ शैक्षणिक अर्हता :- (१)(अ)** अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्रातील मास्टर्सची पदवी किंवा अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्रातील द्वितीय श्रेणीतील बॅचलरची पदवी **किंवा (ब)** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाची अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्रामधील द्वितीय श्रेणीतील पदविका अथवा समकक्ष अर्हता आणि A.M.I.E (इंडिया) चे **"A " व " B"** भाग उत्तीर्ण. **आणि तद्नंतर अनुभवः (क)** विशेषतः उत्पादनाशी निगडीत असलेल्या अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र संस्थेतील व्यावसायिक किंवा अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा तंत्रनिकेतन किंवा तंत्रशास्त्र विषयक संस्थेतील अध्यापनाचा किंवा वर नमूद केलेल्या प्रकारचा व्यावसायिक आणि अध्यापनाचा एकत्रित किमान पाच वर्षाचा अनुभव. **अथवा (२) (अ)** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाची अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्रातील व्दितीय श्रेणीतील पदविका. **आणि तद्नंतर अनुभवः (ब)** वरील १(क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अध्यापनाचा किंवा व्यावसायिक आणि अध्यापनाचा किमान दहा वर्षाचा अनुभव, पैकी पाच वर्षाचा अनुभव प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा तत्सम किंवा उच्च पदाच्या दर्जाचा असावा. **परंतुक ४.४ (१)** जे उमेदवार पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील, त्यांच्या बाबतीत सदर पदवी मिळविण्याकरीता व्यतित केलेला कालावधी, परंतु दोन वर्षापेक्षा जास्त नाही, असा कालावधी उपरोक्त नमूद केलेल्या अनुभवाच्या कालावधीकरीता गणण्यात येईल. **(२)** वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक विहित कालावधीचे अनुभव धारक उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास, कमी अनुभव असलेल्या उमेदवारांचा एकूण विहित अनुभवापैकी ४०% पर्यंत अनुभव शिथील करण्याचा विचार करण्यात येईल. **४.५** भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र उमेदवारांची संख्या पुरेशा प्रमाणात आढळून येत नसल्यास अशा वर्गवारीतील आरक्षित पदे भरण्याच्या दृष्टिने उमेदवारांना शैक्षणिक अर्हतेच्या पदवी किंवा पदविकेच्या श्रेणीमध्ये किंवा अनुभवामध्ये (४०% पर्यंत) किंवा दोन्हीमध्ये आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार शिथिल करण्याबाबत विचार करण्यात येईल.

**५.**प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि /अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६. कर्तव्ये व जबाबदाऱ्या -** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. शुल्क : (१)** अमागास - ₹ **४१०/- (२)** मागासवर्गीय - ₹ **२१०/- (३)** सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणाऱ्या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**९.** अर्ज करण्याची पद्धत :- (१) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.(२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज **www.mpsconline.gov.in** या वेबसाईटद्वारे **दिनांक ३० नोव्हेंबर,२०१० ते दिनांक २८ डिसेंबर, २०१०** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. (३) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.(४) विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.(५)ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वतःचा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित

पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.(६) **मदत :** अर्जाच्या ऑनलाईन स्वीकृतीच्या व्यवस्थेसाठी आयोगाने मे. वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची नियुक्ती केली असून, सदर संस्थेने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांच्या सोयीकरिता महाराष्ट्रातील तालुका स्तरावर व विविध प्रमुख शहरांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकृती केंद्र [Online Application Centre (OAC)] निश्चित केली आहेत. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची (OAC) ची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह उपलब्ध आहे. अधिकृत केंद्राचा पत्ता व मदत ९७५७४४४०२० या दूरध्वनी क्रमांकावरुन उपलब्ध करुन घेता येईल. या केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा / भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त ₹ २४/- इतकी रक्कम सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने संबंधित केंद्रचालकास अदा करावी लागेल. सदर मदत केंद्र संबंधित संस्थेने उमेदवारांच्या सोयीसाठी निश्चित केलेली असल्यामुळे आयोगाचा सदर केंद्रांशी काहीही संबंध नाही.

**१०.** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यातील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही **दिनांक २८ डिसेंबर,२०१०** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद करण्यात येईल.

**११.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या **www.mpsc.gov.in** व **www.mpsconline.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१२.** प्रस्तुत सविस्तर जाहिरात तंत्रशिक्षण संचालनालयाच्या **www.dte.org.in** आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या **www.dirhe.org.in** या वेबसाईटवर उमेदवारांच्या केवळ माहितीसाठी उपलब्ध आहे.

**मुंबई :** **नि. श. पटवर्धन**

**दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१०.** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**